प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

02 नोव्हेंबर, 2015

**दि सी के पी सहकारी बँक लि. मुंबई, महाराष्ट्र,**
**ह्यांना दिलेल्या सूचनांना आरबीआयकडून मुदतवाढ**

दि सी के पी सहकारी बँक लि. ह्यांना, रिझर्व बँकेने, ऑक्टोबर 28, 2015 रोजी दिलेल्या सूचनांना, रिझर्व बँकेने, ऑक्टोबर 31, 2015 रोजी व्यवहार बंद झाल्यापासून पुढील तीन महिन्यांसाठी मुदतवाढ दिली आहे. ह्या सूचनांचे पुनरावलोकन केले जाऊ शकते. ह्या निदेशातील अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल नाही. ऑक्टोबर 28, 2015 रोजीच्या बदल अधिसूचित करणा-या निदेशाची एक प्रत, जनतेच्या माहितीसाठी, वरील बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात आली आहे.

रिझर्व बँकेने वरील निदेशात केलेल्या बदलाचा अर्थ, त्या बँकेच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली असल्याबाबत रिझर्व बँकेचे समाधान झाले आहे, असा लावण्यात येऊ नये.

एप्रिल 30, 2014 रोजी, मे 2, 2015 च्या व्यवहार बंद झाल्यापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी, रिझर्व बँकेने, सी के पी सहकारी बँकेला ह्या निदेशांखाली ठेवले होते. ह्या निदेशांची वैधता, ऑक्टोबर 21, 2014 (नोव्हेंबर 1, 2014 च्या व्यवहार बंद झाल्यापासून), जानेवारी 20, 2015 रोजी (जानेवारी 31, 2015 च्या व्यवहार बंद झाल्यापासून), व जुलै 9, 2015 रोजी (जुलै 31, 2015 च्या व्यवहार बंद झाल्यापासून) अनुक्रमे तीन महिने, सहा महिने व तीन महिने वाढविण्यात आली होती.

**अल्पना किल्लावाला**
प्रधान मुख्य महाव्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन: 2015-2016/1052**